# दिनांक 18/03/2025

1 रोहा पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 01/09/2024 रोजी 00:30 वा ते दि.16/03/2025 रोजी 00:30 वा च्या दरम्यानमौजे न्हावे ता.रोहा येथे महिला फिर्यादी यांच्या घरा जवळ, रोहा येथे आरोपीत रा.वरचा मोहल्ला,मशिदी जवळ,न्हावे पो.न्हावे ता.रोहा यांने फिर्यादी यांचा सतत पाठलाग करून ,त्यांना पाहुन शिटया मारणे, अश्लिल गाणी बोलणे, अश्लिल शिवीगाळ करणे, घराची डोरबेल वाजविने, तसेच फिर्यादी यांना पाहुन लघवी करून फिर्यादीचे मनात लज्जा उत्पन्न करून 16/03/2025 रोजी दुपारी 02.30 वाजण्याचे सुमारास शेगटाचे झाडावर चढुन फिर्यादी यांना पाहून शिटटया मारून, अश्लिल गाणी बोलुन त्रास देवुन "मी माझे बायकोला मारले आहे. तर तुझे पोरींना सोडेल काय. तुझ्या पोरी शाळेत जातात ना'' अशी धमकी देवुन दमदाटी केली.

याबाबत रोहा पोलीस ठाणे गुरनं.56/2025, भारतीय न्याय संहिता 2023 चे कलम 78(1), 79,351(2),324(2) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास मपोह/टेमकर हे करीत आहेत.

2. खोपोली पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 21/11/2024 रोजी 07:30 वा च्या सुमारास मौजे दहीवली गावच्या हद्दीत पालीफाटा येथे निमा सोप या कंपनीमध्ये, खालापुर येथे फिर्यादी रा.भरत कॉंलनी,पाली फाटा खोपोली व त्याचे सहकारी वर नमुद कंपनीचे प्लांट वर कंपनीचे सुपरवायझर आरोपीत क्र.01 यांनी फिर्यादी व त्याच्या सहकार्यांना कोणतेही प्रशीक्षण न देता पाठवीले होते सदर प्लांट वर फिर्यादी हे मिक्सर साफ करण्याचे काम करीत असताना आरोपीत क्रं.02 याने कोणतीही खात्री न करता निष्काळजी पणाने व हयगयीने मिक्सर चालु करण्याचे बटन दाबल्याने फिर्यादी यांचा उजवा हात मिक्सरमध्ये अटकुन मनगटाचे वर कट झाला

याबाबत खोपोली पोलीस ठाणे गुरनं.81/2025, बीएनएस 2023 चे कलम 125, 3(5) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोह/माळी हे करीत आहेत.

3. पेण पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 17/03/2025 रोजी 13:00 वा च्या सुमारास मौजे मुंबई गोवा हायवेने वडखळ बाजुकडे उंबर्डे फाटयाचे पुढे 100 मीटर अंतरावर, ता-पेण येथे जखमी कुणाल संजय मोकल वय 28 वषे व त्यांची आई जखमी 2) हेमलता संजय मोकल वय 54 दोन्ही राफणसडोंगरी गोळीबार मैदान चिकनवाल्याचे बाजुला पेण ता.पेण हीस त्यांचे ताब्यातील रिक्षा क.एम एच 06 बी व्ही 4369 हिने मुंबई गोवा हायवेने वडखळ बाजुकडुन रस्त्याचे डावे बाजुने

जात असताना उंबडे फाटयाचे पुढे 100 मीटर अतरावर जात असताना फिर्यादी यांचे रिक्षाचे पाठीमागुन येणारा महेद बोलेरो जीप वरील अज्ञात चालक आरोपी याने त्याचे ताब्यातील महेद बोलेरो जीप ही अतिवेगाने चालवुन कुणाल संजय मोकल वय 28 वषे व त्यांची आई जखमी न 2) हेमलता संजय मोकल यास ठोकर मारल्याने रिक्षा पलटी होवुन फिर्यादी यांचे डावे हातास , डावे पायास , पोटास कमरेस दुखापती झाल्या आहेत तसेच जखमी नं.02 हेमलता हिचे डोक्यास उजवे हातास दुखापती करुन अपघाताची खबर न देता निघुन गेला.

याबाबत पेण पोलीस ठाणे गुरनं.45/2025 भा.दं.वि.क.281,125a 125b, मोटार वाहन अधिनियम, 1988 चे कलम 184,134 प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास सफौ/श्री.देविदास पाटील हे करीत आहेत

4. खालापूर पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 17/03/2025 रोजी 12:15 वा च्या सुमारास मौजे मुंबई- पुणे एक्सप्रेस हायवे रोडवर किमी नं.30 जवळ पुणे लेनमध्ये ता. खालापुर येथे आरोपीत शिवशाही एस.टी .बस क्रमांक एम.एच.12 व्हि.एफ 8018 वरील चालक यांने त्याच्या ताब्यातील शिवशाही बस ही मुंबई ते पुणे अशी एक्सप्रेसवे ने चालवित घेवून जात असताना ती अपघात ठिकाणी आलेवेळी निष्काळजीपणे व बेदरकारपणे चालवुन पुणे बाजुकडे जाण-या टँकर नं.जी.जे.16/डब्लयु .8956 चे मागील बाजुस ठोकर मारून अपघात होणेस व अपघातामध्ये स्वतास देखील दुखापती होणेस कारणीभुत झाला.

याबाबत खालापूर पोलीस ठाणे गुरनं.91/2025, भा.न्या.सं.2023 चे कलम 281,125 अ) सह मोटार वाहन कायदा कलम 184 प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोह/अमित सावंत हे करीत आहेत

## वाहतूक केसेस

दिनांक 17.03.2025 रोजी 28 पोलीस ठाण्याच्या अखत्यारीत वाहतुक शाखेचे अधिकारी व कर्मचारी यांनी वाहतुकीचे नियम भंग करणा-या एकूण 185 इसमावर कायदेशीर कारवाई करण्यात आली असून त्यांच्याकडून 2,06,250/-रुपये इतका दंड आकारला आहे.